MHOS050004402022

दिवाणी किरकोळ अर्ज क्र. ५६/२०२२
अकबर / प्रोजेक्ट डायरेक्टर व इतर १

**निशाणी क्र. १६ खालील आदेश**

१. सदर अर्ज अपील मेमो मध्ये दुरुस्तीसाठी दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ६ नियम १७ प्रमाणे दाखल केलेला आहे.

२. अपीलार्थीचे असे कथन आहे की, सदर अपील दाखल करते वेळेस लवाद न्यायालयाचे मुळ आदेशाच्या दिनांकामध्ये तांत्रीक चुक झालेली आहे. सदरची तांत्रीक चूक दुरुस्त होणे नैसर्गिक न्यायाचे दृष्टीकोनातून गरजेचे आहे. अपील क्लेम मध्ये लवाद आदेश दिनांक १६.०२.२०२२ व पुर्नविलोकन अर्ज १/२०२२ आदेश दिनांक २७.०५.२०२२ असे नमुद करणे आवश्यक आहे. परंतु दिनांक नमुद करण्यामध्ये तांत्रीक चुक झालेली आहे. अपील मेमोचे क्लेम व परिच्छेद २३ च्या क्लॉज 'सी' मध्ये तद्अनुषंगीक दुरुस्ती करणे आवश्यक आहे. सबब सदर दुरुस्ती अर्ज वरील कारणास्तव दाखल करण्यात आलेला आहे.

३. सदर अर्जावर गैरअर्जदार यांनी लेखी म्हणणे (निशाणी १७) दाखल केलेले आहे व सदर दुरुस्ती अर्जास हरकत घेतलेली आहे. सदर अपील हे सन २०२२ मध्ये दाखल करण्यात आलेले आहे व सदर प्रकरण अंतीम युक्तीवादासाठी प्रलंबीत असताना दुरुस्ती अर्ज दाखल करण्यात आलेला आहे. अशा परिस्थितीत सदर दुरुस्ती अर्ज फेटाळण्यात यावा अशी विनंती गैरअर्जदार यांनी केलेली आहे.

४. सदर अर्जाचे निर्णयाकरीता आवश्यक मुद्दे व त्यावरील माझे निष्कर्ष खालीलप्रमाणे –

| अ.क्र. | मुद्दे | | निष्कर्ष |
|---|---|---|---|
| १. | प्रस्तावीत दुरुस्ती अपील अर्जाचे योग्य व अंतीम निर्णयाकरीता आवश्यक आहे का ? | : | होय. |
| २. | काय आदेश ? | : | अंतिम आदेशाप्रमाणे. |

**मुद्दा क्र.१ व २ करीताः–**

५. अपीलार्थी व गैरअर्जदारतर्फे विद्वान वकीलांचा युक्तीवाद ऐकला. कागदपत्रांचे अवलोकन केले. अपीलार्थी यांनी सुचवलेली दुरुस्ती ही तांत्रीक स्वरुपाची आहे. सदर दुरुस्तीमुळे अपीलाचे मुळ स्वरुपात बदल होणार नाही. तसेच त्यामुळे गैरअर्जदार यांचे हक्कावर कोणतीही बाधा येणार नाही. अपीलार्थी यांनी सुचवलेली दुरुस्ती ही अपील अर्जाचे योग्य व अंतिम निर्णयाकरीता आवश्यक आहे. सबब मी मुद्दा क्र.१ चा निष्कर्ष होकारार्थी देत आहे व मुद्दा क्र.२ चे निष्कर्षास अनुसरुन खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आ दे श

१. सदर अर्ज मंजूर करण्यात येतो.
२. अपीलार्थी यांनी अर्जात नमुद केलेली दुरुस्ती अपील मेमोमध्ये आजपासून १४ दिवसाचे आत करावी.
३. सदर दुरुस्ती केल्यानंतर दुरुस्त अपील मेमोची प्रत या प्रकरणात दाखल करावी व एक प्रत गैरअर्जदार यांना दयावी.

Digitally signed by MANGESH RAMESH DESHPANDE
Date: 2025.09.19 17:17:35 +0530

**( मंगेश आर. देशपांडे )**

दिनांकः– १९.०९.२०२५ जिल्हा न्यायाधीश–१, उमरगा.

**CERTIFICATE**

I affirm that, the contents of this P.D.F. file Judgment / order are same, word to word, as per the original Judgment / order.

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | – | Shriram Hanmant Kale, Stenographer Grade-I |
| Court | – | District Court-1, Omerga |
| Date | – | 19.09.2025 |
| Order signed by the Presiding Officer on | – | 19.09.2025 |
| Order uploaded on | -- | 19.09.2025 |